IJAER/March-April-2025/Volume-14/Issue-2 ISSN: 2278-9677
International Journal of Arts & Education Research
(Peer-Reviewed, Open Access, Fully Refereed International Journal) Impact Factor:7.06

# समाज, संस्कृती आणि पर्यावरण

**Balu Anand Bhandare**
**Asst. Professor(CHB) in S.V.M.Arts College Kinwat**
**Dr.B.A.M. University Chtr. Sambhajinagar, Dist.Nanded**

**Dr. Maroti Ghuge**
**Professor, Dr.B.A.M.University, chtr. Sambhajinagar**

**प्रस्तावना :**

मानवाने भौतिक सुखाच्या हव्यासापोटी पर्यावरणाचे शोषण सुरू केले आहे त्यामुळे पर्यावरणाच्या विविध घटकातील मनुष्याचा हस्तक्षेप वाढत गेला आणि पर्यावणारी स्थिती चिंताजनक होऊ लागली आहे. मानवाच्या गरजा वाढल्यामुळे त्याने अनेक घातक पावले उचलेली व मानवी जीवनात पर्यावरणाचे स्थान किती महत्वाचे आहे याची आग मानवाला अधिकाधिक तीव्रतेने जाणीव होऊ लागली आहे, पर्यावरणाया ऱ्हास होऊ लागल्यामुळे ते प्रतीकुल होऊ लागले आहे आणि आज त्यामुळे साऱ्या जगाने लक्ष आता अनुकुल पर्यावरणाकडे लागले आहे. तसेच पिण्याचे पाणी, इंधन, अन्नधान्य, शुध्द हवा या गोष्टीचा काही तुटवडा व कधी सुकाळ  हया समस्या निर्माण झालेल्या दिसतात. या सर्वच समस्या सोडवण्यासाठी पर्यावरण विषयक संपूर्ण जागृती लोकामध्ये व्हायला हवी म्हणूनच या विषयाने अध्ययन केले आहे. मानव व त्याच्या सभोवताली असणारे पर्यावरण याचा अतिशय घनिष्ट संबंध आहे. पृथ्वीवरील सजीवसृष्टी निकोप राहण्यासाठी स्वच्छ व सुंदर पर्यावरणाची गरज असते. मानवाच्या बहुतांश गरजा पर्यावरणातुनच भागविल्या जातात. मागील शतकापासून प्रचंड प्रमाणात वाढलेली लोकसंख्या व औदयोगिकरणामुळे पर्यावरण व मानव यांच्यातील समतोल ढासळा आहे. प्रचंड प्रमाणात वाढलेली लोकसंख्या व औदयोगिकरणामुळे निसर्गात मानवी हस्तक्षेप वाढला आहे. औदयोगिकरणातुन नागरिकरणाला चालना मिळाली व त्यातुन राहण्याचा जागेचा प्रश्न, वाहनांची वर्दळ, सांडपाण्याची विल्हेवाट लावण्याचा प्रश्न, वाहने व कारखान्याव्दारे होणारे प्रदुषण इत्यादीमुळे जगात पर्यावरणीय समस्या निर्माण होऊन निसर्गातील निरनिराळया परिसंस्थांचा समतोल बिघडला आहे.

**समाज आणि पर्यावरण :**

"मानव आणि पर्यावरण यांचे अनन्यसाधारण महत्व आहे. संपूर्ण मानवाचे जीवन पर्यावरणाशी निगडित आहे. असे सांगण्यासाठी सामाजिक पर्यावरण म्हणजे काय हे काही भुशास्त्रज्ञानी खालील प्रमाणे स्पष्ट केले आहे. डॉ. राम यांच्या मते आपल्यावर परिणाम करणारी कोणतीही बाहयशक्ती म्हणजे पर्यावरण होय. डॉ. किंम्बाल युग यांच्या मते जी व्यक्ती स्थिती किंवा प्रेरणा अगर उदद्दीपण सजीव वस्तुवर बाहेरुन प्रभाव पाडतात त्यांना पर्यावरण असे म्हणतात."[1]

निसर्ग म्हणजेच प्रकृती सर्वात मोठी व्यवस्था आहे. पर्यावरण म्हणजे आपल्या जवळ असलेला निसर्गाचा भाग. आणि आपण म्हणजे मानव हा विराट व अनंत पसरलेल्या व्यवस्थेमधील एक छोटे कण मात्र आहेत. भगवान बुध्दांचं एक वचन आठवते धम्मपदामध्ये त्यांनी म्हटंल आहे की, मानव भहय देशामध्ये आहे. त्याचा  अर्थ मानव हया सर्व अस्तित्वाच्या माध्यमाध्ये आहे. हयाला आजच्या वैज्ञानिक भाषेत सांगायच तर सर्वात सुक्ष्म वस्तु अणु किंवा अणुचाही मुळ कण आणि

सर्वात मोठ विश्व अनंत पसरलेलं हया दोन टोकांच्या बरोबर मध्यभागी मानत आहे. मानव अणुपेक्षा तितकाच मोठा आहे. जितक विश्व मानवापेक्षा मोठा आहे.

पर्यावरण ही संज्ञा मुलत म्हणजे सभोवतालची परिस्थीती या अर्थाने प्रचलित आहे. जीवशास्त्रीय दृष्टया सजीवांच्या सभोवतालच्या परिस्थितीला पर्यावरण असे म्हणतात. सजीवा मधील वनस्पती, प्राणी व सुक्ष्मजीव यांच्यात मानवप्राणी बुध्दी, कल्पनाशक्ती, वाचनशक्ती, यांच्या जोरावर श्रेष्ठ ठरत आसल्याने मानव आणि पर्यावरण यांच्या संबंधाना जास्त महत्व प्राप्त होते.

मानवाचे पृथ्वीवरील अस्तित्व सुमारे १० ते २० लाख वर्षापासुन आहे. काळाच्या ओघात मानवी समाजाची उत्क्रांती होत गेली. शेतीतंत्राचा शोध लागेपर्यंत मानवाचे जीवन भटके व अस्थिर स्वरुपाचे होते. इतर प्राण्यांमध्ये मानवी समुह पर्यावरणाच्या आवाक्यातच मुलभूत गरजाची पुर्तता करीत असत. मानवाचे निसर्गविषयक ज्ञानही मर्यादित होते. मानवी विकासाच्या वाटचालीचा एकूण आलेख पाहता गेल्या पाचशे वर्षातच सामाजिक, वैज्ञानिक, सांस्कृतिक क्षेत्रात वेगाने बदल झाले हे स्पष्ट होते. आणि आपण पाहिले तर आज पर्यावरणात अनेक ठिकाणी उद्रेक होताना दिसतात. देशामध्ये अनेक ठिकाणी दुष्काळ पसरला आहे. पहाडामध्ये वणवे पेटत आहेत, आणि संपूर्ण जगात कुठे भुकंप येत आहेत. आणि प्रामुख्याने कचऱ्याचा सर्वात मोठा प्रश्न आज आपल्याला भेडसावत आहे. घन कचरा आणि ओला कचरा ओला कचऱ्यात भाजीपाला निवडुन उरलेले देठे, शिळे अन्न यांचा समावेश होतो. शक्यतो आपल्या गरजेइतकच अन्न शिजवले तर अन्नाची नासाडी होणार नाही.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1. भौगोलिक पर्यावरण व सामाजिक पर्यावरण ही संकल्पना स्पष्ट करणे.
2. सामाजिक पर्यावरणाच्या विविध घटकांचा अभ्यास करणे.
3. पर्यावरण या संकल्पणेचा अभ्यास करणे.

**गृहितके :**

1. धर्म संस्कृती आणि पर्यावरण हे सामाजापुढील एक महत्वपुर्ण आव्हान आहे.
2. पर्यावरणासंबंधीची जाणीव वाढावी त्याबद्दल आस्था व जागृती निर्माण करणे.

**संशोधन पध्दती :**

शोधनिबंध पस्तुत अध्ययन करताना प्रामुख्याने व्दितीय साधनाच्या आधारावर आहे त्यामध्ये विविध दुयम स्रोत पुस्तके, मासीके, संकेतस्थळांचा शोधनिबंधासाठी वापर करण्यात आलेला आहे.

**"पर्यावरण संरक्षण अधिकनियम १९८६**

पर्यावणाचे संरक्षण व सुधारणा करण्यातील खालील माहिती दिली ज्याअर्थी जून १९७२ मध्ये स्टॉकहोम येथील संयुक्त राष्ट्रांच्या मानवी पर्यावणासंबंधीच्या ज्या परिषदेमध्ये भारताने भाग घेतला होता त्या परिषदेत मानवी पर्यावरणाचे संरक्षण व सुधारणा करण्यासाठी समुचित उपाययोजना करण्यासंबंधी निर्णय घेण्यात आला होता."[2]

**सामाजिक पर्यावरण :**

पृथ्वीवरील मानवाचे वास्तव्य हे हजारो वर्षापासुन आहे. काळाच्या ओघात मानवी समाजाची उत्क्रांती होत गेली. मानवाच्या गरजा, मानवामधील परस्पर संबंध, सामाजिक बंधने, विकास, सांस्कृतिक वाटचाल या दिशेने मानवी समाजाची वाटचाल होत असते. या दृष्टीने विचार केल्यावर मानव आणि पर्यावरण यांचा घनिष्ठ संबंध दिसुन येतो.

**सांस्कृतिक पर्यावरण :**

"मानवी जीवनात पर्यावरणाचे स्थान महत्वाचे आहे. मानव हा पर्यावरणातील एक महत्वपुर्ण घटक असल्यामुळे पर्यावरण व मानव यांचा घनिष्ट स्वरुपाचा संबंध आहे. मानवी संस्कृतिच्या जडणघडित पर्यावरणाचा मोठा वाटा असतो. पर्यावरणात विविधता असल्यामुळे मानवी संस्कृतीतही विविधता असते. प्रत्येक मानवाला स्वतःहाची एक संस्कृती असते. त्या संस्कृतीत मानव जन्मतो, जगतो व मरण पावतो जन्मापासुन मरेपर्यंतचा त्याचा मधला प्रवास हा या सांस्कृतिक पर्यावरणात होत असतो. प्रत्येक समाजाला संस्कृतीत, सांस्कृतिक जडणमडणीत विशिष्ट इतिहास भुगोल, महत्वांचे घटक ठरतात. सांस्कृतिक पर्यावरणात जीवनमुल्ये व जीवनधारणांचा समावेश होतो. त्याचबरोबर मानवाच्या प्रेरणा. उदिष्टे, मानवाचे व्यक्तीमहत्व, या घटनामध्ये अंतर्भुत असतात. मानवाचा परस्पर व्यवहार यातुन अनेक बदल घडत असतात. त्याचा समावेश सांस्कृतिक पर्यावरणात होतो पर्यावरणातुन संस्कार उन्नती घडत असते. संस्कार उन्नतीक गरज म्हणुन कलाकृती निर्माण होतात. समाजाला प्रेरणा देण्याचे व प्रबोधन करण्याचे काम साहित्यकृती करीत असते. प्रत्येक राष्ट्र, मानव, समाज, साहित्यिक यांच्या सांस्कृतिक पर्यावरणाचा अंतर्भाव साहित्यात होतो. या दृष्टीने सांस्कृतिक पर्यावरणाचे स्थान समाजामध्ये खुप महत्वाचे स्थान आहे."[3]

निसर्गशक्ती आणि मानवयुक्ती यांचा मिलाफ मानवी प्रगतीसाठी जे आवश्यक आहे किंबहुना त्याही पेक्षा जास्त निसर्ग नियमांच्या एकूण प्रकृतीस आवश्यक आहे. शास्त्रीय ज्ञान मानवासहित सकल जीवसृष्टीच्या जीवनक्रमासाठी आवश्यक आहे जीवनतत्व पर्यावरणाशास्वाच्या अभ्यासातून प्रतिबिंबित होते. मानवी जीवन सुसहय्य होईल हे समजण्यासाठी पर्यावरणाशास्त्राची नितांत गरज आहे,

**पर्यावरणाचा अर्थ/प्रकारः**

पर्यावरण हा शब्द परि + आवरण अशा दोन शब्दांनी मिळून तयार झाले आहे. 'परि' या अर्थ आहे चारही बाजूनी व 'आवरण' म्हणजे घेरलेला म्हणून लोक भूचारही बाजूनी घेरलेल्या वातावरणाला पर्यावरण असे म्हणतात.

डॉ. एच. डेव्हीस म्हणतात, "पर्यावरणाचा अभिप्राय हा भूमी किंवा माणसाच्या सभोवती असणाऱ्या भौतिक स्वरुपाशी आहे. याचा मानवाच्या सवयीवर जीवनावर होणारा परिणाम स्पष्टपणे दिसून येतो."[4] पर्यावरणाचा अभिप्राय सामाजिक, संस्कृतिक परिस्थिती द्वारा समाज जीवनाला प्रभावित करीत असते.

बर्नाड नोबेल यांच्या मते, "पर्यावरणशास्त्र म्हणजे विविध परिसंस्थांच्या प्रणालीच्या परस्परातील संबंधाच्या संतुलन मूलक तत्वांचा शास्त्रीय अभ्यास"[5]

**पर्यावरणाचे मुख्यतः दोन प्रकार पडतात ते पुढील प्रमाणेः**

- नैसर्गिक पर्यावरण नेसर्गिक पर्यावरणात मृदावरण, जलावरण, वातावरण, प्राणी वनस्पती, सूक्ष्म जीव यांचा अभ्यास होतो.
- सांस्कृतिक पर्यावरण सांस्कृतिक पर्यावरणात लोकसंख्या, सामाजिक, राजकीय, धार्मिक व सांस्कृतिक बाबींचा विचार होतो.

**संस्कृतीचा अर्थ/प्रकारः**

मानवी समाजाचे मुलधन म्हणजे संस्कृती होय. मानवी जीवन जगण्याची पद्धती म्हणजे संस्कृती होय. 'संस्कृती' हे मानवी समाजाचे अजिभाज्य लक्षण मानले जाते. संस्कृतीचा अर्थ सांगतांना

डॉ. इरावती कर्वे म्हणतात, "मानव समाजाच्या डोळयांना दिसणारी वस्तुरुप निर्मिती व डोळयांना न दिसणारी पण विचारांना आकलन होणारी मनोगत सृष्टी म्हणजे संस्कृती होय."[6]

समाजात व्यक्तीच्या परस्परांमधील अंतरक्रियांमधून व विचारांच्या देवाण घेवणीतून संस्कृतीची निर्मिती होते. आपले सामाजिक जीवन सहज सुलभ व्हावे म्हणून सामाजिक व्यवहाराचे विविध नियम तयार करतात. उदा. रुढी, परंपरा व कायदे वगैरे. त्यांचा समावेश संस्कृतीमध्ये होतो. स्वतःचे भौतिक जीवन सुसहय्य व्हावे म्हणून नैतिक पर्यावरणाचा जास्तीत जास्त फायदा घेऊन समाजातील व्यक्ती भैतिक वस्तू निर्माण करतात. उदा. अन्न, वस्त्र व यंत्रे वगैरे. या सर्वांचा समावेश संस्कृतीमध्ये होतो. व्यक्ती परस्परांशी व निसर्गाशी ज्या अंतरक्रिया करतात त्यातूनच या सांस्कृतिक गोष्टी निर्माण होतात व म्हणून संस्कृती मानव निर्मित आहे असे म्हणता येईल. **"संस्कृतीचे मुख्यतः दोन प्रकार पडतात ते पुढील प्रमाणे :**

1. भौतिक संस्कृतीः समाजातील व्यक्तीच्या नानाविध गरजा पूर्ण करण्याच्या प्रयत्नामधूनही भौतिक संस्कृती निर्माण झालेली असते. भौतिक किंवा नैसर्गिक पर्यावरणाचा जास्तीत जास्त उपयोग करुन ही संस्कृती निर्माण केलेली असते. मानवाचे जीवन सुखी व समृद्ध बनविणे हे त्या मागचा प्रमुख उद्देश असतो. त्यामुळे भौतिक संस्कृतीला साधनात्मक मूल्य असते.
2. अभौतिक संस्कृतीः अनेक मानव निर्मित गोष्टीना भौतिक अस्तित्व नसते. म्हणजे त्या डोळयांनी दिसू शकत नाहीत, पण समाजातील व्यक्तीच्या मनात त्यांचे अस्तित्व असते. अशा गोष्टींचा समावेश अभौतिक संस्कृतीमध्ये होतो. उदा. रुढी, परंपरा, श्रद्धा व कायदे इत्यादी. थोडक्यात भौतिक संस्कृती ही माधन स्वरुप असते तर अभौतिक संस्कृती ही सामान्यतः साध्य स्वरुप असते. भौतिक संस्कृती अभौतिक संस्कृतीपेक्षा अधिक परिवर्तनशील असते. व्यक्ती भौतिक, सांकृतीक गोष्टींचा उपभोग घेतात तर अभौतिक सांस्कृतीक गोष्टी जगतात.

संस्कृती हा वातावरणाचा मानवनिर्मित भाग आहे. भौगोलिक व सामाजिक वातावरणाशी समायोजन करुन घेण्यासाठी मानवाने निर्मिलेल्या तंत्र साधनांना संस्कृती म्हणता येईल. संस्कृती हा मानवाचा उपजत गुणधर्म नसून मानवास संस्कृती शिकावी लागते. समाजाचा सभासद या नात्यानेच मानवास असे शिक्षण मिळणे शक्य आहे. संस्कृ ती ही समाजाच्या सामुहिक मालकीची असते. या अर्थी संस्कृतीस सामाजिक वारसा म्हणून संबोधता येईल, संस्कृती ही एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होते. याच बरोबर संस्कृती ही संचयी स्वरुपाची देखील आहे. संस्कृती प्रतीकात्मक आहे. संस्कृती परिवर्तनशील आहे. संस्कृती ही वर्तन निर्धारण करणाऱ्या प्रमाणक प्रतीमानाची, एकीकृत व सुसंबद्ध अशी एक व्यवस्था आहे. इत्यादी संस्कृतीचे वैशिष्टय सांगता येतील."[7]

**संस्कृती पर्यावरण महत्व :**

"नैसर्गिक पर्यावरणातल्या विविध घटकांपैकी मानव हा महत्वपूर्ण सजीव घटक आहे. ज्ञान, वाचा, इच्छाशक्ती यांच्या सामर्थ्याने मानव प्रचलित निसर्ग व्यवस्थेत शक्य तेवढे बदल घडवून जीवनक्रम व्यतीत करतो. जीवन जास्तीत जास्त समृद्ध करण्याचा मानवाचा अव्याहत प्रयत्न सुरु असतो. मानवाने निसर्गात घडवून आणलेल्या बदलांमुळे निर्माण झालेल्या पर्यावणास सांस्कृतीक पर्यावरण म्हणतात. मानव अधिवास शेती, कारखानदारी, समाज, तंत्रज्ञान, वाहतूक, राजकारण, संस्कृती या सारख्या घटकांचा सांस्कृतिक पर्यावरणात समावेश होतो. सांस्कृतीक घटकांचे पर्यावरणात चांगले तसेच वाईट परिणाम होत असतात. पर्यावरणाच्या प्रकृती बाबत मानव

बेफिकीर, अविचारी व निर्धात असल्यामुळे निसर्गनियमांचा तोल ढळत आहे. पर्यावरणात मानवी क्रियांची ढवळाढवळ प्रगती बरोबरच विसंगती निर्माण करीत आहे. म्हणून मानवी क्रिया, प्रक्रिया, निरीक्षण, सर्वेक्षण, विश्लेषण व अध्ययन यांचे पर्यावरण शास्त्रात अनन्यसाधारण महत्व आहे. एकता, बंधुता व समता या मानवी मूल्यांचे सर्व स्तरावर रोपण करणे हे पर्यावरणशास्त्र एक महत्वाचे उद्दिष्ट आहे."[8]

मनुष्य जातीला पाषाण युगापासून आजच्या टेक्नॉलॉजीच्या पोहचविण्याचे कार्य निश्चितच शिक्षणाला जाते. शिक्षणाने मनुष्याला पदोपदी मदत केली. आता पर्यावरणाची मदत करण्याची जबाबदारी शिक्षणाची आहे त्याच उददेशाने पर्यावरणाचा समावेश शिक्षणात करणे क्रमप्राप्त ठरते आहे. "जगभरात चिंताजनक रुप धारण केलेल्या पर्यावरण विषयक समस्यांवर मदत करण्याचे एकमात्र प्रभावी साधन महणजे शिक्षणच होय. "[9] याच जाणिवेतून पर्यावरण शिक्षण नावाची जागृती करणारी संकल्पना उदयास आली आहे.

१९७० साली अमेरिकेच्या पर्यावरण शिक्षणाच्या कायदयात पर्यावरण शिक्षणाची व्याख्या पूढील प्रमाणे मांडली, "पर्यावरण शिक्षण म्हणजे मानवाच्या त्यांच्या नैसर्गिक व मानवनिर्मित परिसराशी असलेल्या संबंधाचा अभ्यास करणारी एक पक्रिया होय? "[10] नैसर्गिक व मानवनिर्मिती परिसराची सखोल माहीती शालेय स्तरावरच जर विद्यार्थीना झाली तर नक्कीच पर्यावरणाचे संवर्धन होईल. रे हॉन "मानव त्यांची संस्कृती आणि जैव प्राकृतिक परिस्थिती यातील परस्परावलंबन समजण्यासाठी व मूल्यांकन करण्यासाठी आवश्यक असलेली कौशल्ये व दृष्टिकोन विकसीत करण्यासाठी मूल्य व संकल्पनांना मान्यता देण्याची प्रकिया म्हणजेच पर्यावरण शिक्षण होय. "[11] अतिवृष्टी, तापमान वाढ, ओझोनचा क्षय भुकंप प्रदुषण यांचा अनुभव प्रत्येक मनुष्यास होतो अशा सर्व समस्यांची, जाणीव जागृत करण्याचे कार्य पर्यावरण शिक्षणाचे आहे.

**पर्यावरण शिक्षणाची उदिष्टयेः**

पर्यावरण शिक्षणाची उदिष्टये ठरविण्यासाठी १९७२, १९७५, १९९२ साली विविध ठिकाणी वेगवेगळया परिषदा घेण्यात आल्या व खालील उदिष्टये निश्चित करण्यात आली.

1. पर्यावरणाच्या विविध घटकांचे ज्ञान देणे.
2. पर्यावरणाचे मानवी जीवनातील महत्त्व पटवून देणे.
3. स्थानिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील पर्यावरणाच्या प्रदुषणाविषयी जागृती निर्माण करणे.
4. पर्यावरण संवर्धनात मानवाची भूमिका विशद करणे.
5. आधुनिकिरण आणि प्रदुषण यांच्यातील माहीती देणे.
6. वन्य जीवांचे महत्व पटवून देणे.
7. वृक्ष संवर्धनाचे महत्व विशद करणे.
8. पर्यावरण विषयक कायद्यांची आणि नियमांची माहिती देणे.
9. पर्यावरण विषयक चळवळी उभारण्याची प्रेरणा देणे.
10. पर्यावरण संवर्धनाकरिता आदर्श नागरिक निर्माण करणे.

**पर्यावरण विषयक आव्हाणे :**

आपल्या वारसांसाठी काही कमवून ठेवण्याची व्यवस्था प्राचिन काळापासून पिढयानपिढया चालु आहे. परंतू येणाऱ्या काळात वाटचालीसाठी आव्हाने निर्माण करणारी आजची पिढी काम

करतांना दिसत आहे. येणारी पर्यावरणा समोरील आव्हाने अतिशय गुंतागुंतीची आणि भयावह दिसत आहे.

"जो बीत गया तो वक्त भला होता है।
आनेवाली घडियों में बम कहर छिपा होता है।"[12]

या शायरीची आजच्या काळात पदोपदी आठवण आल्याशिवाय राहणार नाही आजच्या घडीला 'दिल्ली' या शहरातील 'प्रदुषण समस्या आपल्या डोळयासमोर आहे असे अनेक पर्यावरण विषयक आव्हाणे निर्माण होणारे आहेत. ती आव्हाणे पुढील प्रमाणे

**१. लोकसंख्या विस्फोट :**

आजचे जग लोकसंख्या नावाच्या बॉम्ब वर बसलेले आहे असेच म्हणावे लागेल केवळ भारताचा विचार केला असता स्वांतत्र्य मिळाले तेंव्हा ६० कोटीच्या आसपास असणारी लोकसंख्या आज ७५ वर्षानंतर 140 कोटी पर्यंत येवून ठेपली. म्हणजे लोकसंख्या विस्फोटा बरोबर त्यांच्या गरजांचा सुध्दा स्फोट होतांना दिसतो त्याचा दुष्परिणाम पर्यावरणावर होतांना दिसतो आहे. दैनदिन लागणाऱ्या वस्तु, अन्न, निवारा हया सर्व निसर्गातूनच मिळतात. त्यामूळे हे सर्वात मोठे आव्हान ठरते.

**२. दुष्काळः**

एकविसाव्या शतकातील प्रचलित शब्द म्हणजे दुष्काळ होय. २०१९ या वर्षी मार्च, एप्रिल, जुन महीन्यात कोरडा दुष्काळ तर ऑक्टोबर, नोव्हेंबर महिन्यात ओला दुष्काळ सदृश्य परिस्थीती निर्माण झाली ही तर फक्त सुरुवात आहे येणारा काळ तर भयंकर ठरणार असे वाटते आहे. ऐब अरामाच्या चैनीच्या चीज वस्तुची चंगळ होईल परंतू अन्नधान्य, पाणी शुध्द हवा या गोष्टी दूर्मिळ ठरतील.

**□. नैसर्गिक आपत्तीः**

मनुष्य निसर्गाचाच अंश असल्यामूळे तो जितका त्याच्यापासून दूर जाईल तितका दु:खी होईल. जगभरात कृत्रिम जीवन शैलीचा वापर होत असल्यामूळे नैसर्गिक आपत्ती येणारच हे नक्की उदा. वादळ, महापूर, किणोत्सार, ओझोन कवच क्षय, त्सुनामी, तापमान, वाढ अतिवृष्टी इत्यादी नैसर्गिक आपत्तींचा सामना येणाऱ्या काळात आव्हान ठरणार आहे.

**४. प्रदुषणः**

भविष्यातील मानव निर्मिती सर्वात हे मोठे आव्हाण म्हणजे प्रदुषण होय., वायू, जल, भूमी, किरणोत्सार व इतर प्रकारच्या प्रदुषणामूळे मानवास जीवंत राहणे कठीण जाणार आहे. उदयोगधंदे, कारखाने, वाहने, इत्यादीमूळे प्रदुषण नावाचा आजार आज भेडसावतांना दिसत आहे वेळीच यावर उपाय केला नाही तर एकदिवस सजिव सृष्टी नष्ट होणास वेळ लागणार नाही.

**५. जल संकटः**

'जल ही जीवन है।' महटल्याप्रमाणे मनुष्यास पाणी हे जीवन जगण्यासाठी लागणार महत्वाचा घटक कमी पडणार आहे. लोकसंख्या विस्फोट गरजांचा स्फोट औदयोगिकीकरण, उर्जा निर्मिती, शहरीकरण, पदुषण सिंचनाखालील वाटते क्षेत्र यामूळे मध्या जल संकट निर्माण होत आहे. याही पूढे जावून म्हणावे लागेल की पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होत आहे. तिसरे महायुध्द झालेच तर पाण्यासाठी होईल. एवढी गंभीर समस्या समाजासमोर येऊ घातली आहे.

जीवनमूल्यांचा ऱ्हास, विज्ञान तंत्रज्ञानाची झपाट्याने होणारी वाढ अश्या इतर ही असंख्य कारणांनी पर्यावरण धोक्यात येत आहे. हे सर्व पर्यावरण विषयक आव्हाणे स्विकारून उपाय योजावे लागतील अन्यथा आपले अस्तित्व डावावर लागेल.

**६. जीवन मूल्यांचा -हासः**

जगण्याच्या प्रचंड स्पर्धेत जीवनमूल्यांचा ऱ्हास झपाटाने होतो आहे. "अग्नी कुंडात टाकलेला कापूर क्षणात जळून खाक होतो. अशी पोटाच्या आगीत मानवी मूल्य नष्ट होतील. लोकसंख्या वाढत आहेत गरीबी, अज्ञान यामुळे मानवता नष्ट होत आहे. हया सर्वांचा विपरीत परिणाम पर्यावरणावर होत आहे. मानवी मूल्यच नष्ट झाली तर बाकी कशाचाही विचार होणार नाही हे एक आव्हानच आहे.

**७. विज्ञान तंत्रज्ञानाची झेपः**

आता आमच्या देशाला वैज्ञानिकांची नव्हे तर कल्पना करण्याची गरज आहे हे जपानी वैज्ञानिकाच विधान अचंबित करणारे आव्हाण आहे. कल्पना केलेल्या सर्व बाबी विज्ञान व तंत्रज्ञानाचे विकसित केल्या व निसर्गाचा समतोल ढासळून टाकला आहे. यामुळे सुध्दा येणाऱ्या काळात यंत्र मानव व महासंगणकाच्या सानिध्यात पर्यावरणाचे संवर्धन करण्यात मोठे आव्हान आहे. पुढची पिढी हे आव्हान कसे पेलणार हे त्यांच्याच कर्तृत्वावर अवलंबून आहे. तेव्हा आपण यामध्ये काही भर न घालता पर्यावरणाचा विचार करणे गरजेचे आहे.

**उपायः**

पर्यावरण विषयक निर्माण झालेली आव्हाने पेलण्यासाठी शैक्षणिक स्तरावर उपाय योजना करणे आवश्यक ठरते. केवळ शिक्षण क्षेत्रच या आव्हानांना पेलून योग्य उपाय योजना करुन पर्यावरण संवर्धन करु शकते त्यातून प्रत्येकांना आपापली जबाबदारी समजून आपण आपले कर्तव्य समजून घेतले पाहीजे. पूढील उपाय जर कर्तव्य म्हणुन स्विकारले तर नक्कीच पर्यावरणीय समस्या कमी होतील.

1. पर्यावरण संवर्धन एक सामाजिक व आंतरराष्ट्रीय गरज मानली पाहीजे.
2. लोकसंख्या वाढ, वनांचा विनाश व सुपिक जमीनीचा ऱ्हास रोखला पाहिजे
3. औदयोगिकरणावर मर्यादा घालणे
4. निरक्षर आणि साक्षर लोकांमध्ये पर्यावणविषयक जागृती करणे
5. पर्यावरण संवर्धनाचा समावेश करणे
6. नैसर्गिक संसाधनाचे संवर्धन करणे
7. मनुष्याने निसर्गात कमीत कमी हस्तक्षेप केला पाहीजे
8. नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन, विज्ञान, तंत्रज्ञानाच्या साहयाने करणे,
9. पर्यावरणाच्या ऱ्हासाच्या दूष्परीणामी अमलबजावणी होणे गरजेचे ठरते.

समारोप :

समाज, संस्कृती आणि पर्यावरण या त्रिकुटाची सांगड योग्यरीतीने घातली पाहिजे. व्यक्तिसमूहाने समाज बनतो. त्या समाजाकरवीच समाज स्वास्थासाठी संस्कृतीची निर्मिती केली जाते. संस्कृती हा समाजाच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. समाजाच्या गुणवैशिष्टयांमुळे संस्कृतीचे स्वरूप सतत प्रवाही आहे. विशेषत: आजच्या काळात जग जवळ आल्यामुळे नित्यनव्याने इतर संस्कृती

संबंधाने जीवनरीतीवर संस्कार होवून संस्कृतीची सरमिसळ होणे अपरिहार्य झाले आहे. अशावेळी समाज व संस्कृतीचा मदतीने पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करू शकतो.

**निष्कर्ष :** संशोधनांतीचे निष्कर्ष असे आहेत.

1. संस्कृती म्हणजे समाजमनाची सर्वसाधारण स्थिती किंवा प्रवृत्ती होय. याच वृत्तीचा वापर करून पर्यावरण संवर्धन करता येते.
2. संस्कृती म्हणजे एकूण समाजाच्या नैतिक विकासाचे सर्वसाधारण स्थिती होय. या नैतिकतेच्या आधारेच पर्यावरण वाचवु शकतो.
3. संस्कृती म्हणजे त्या-त्या समाजाची विकसित झालेली कलात्मकता व बौध्दीक वृत्तीची समग्रता होय. म्हणूनच समाज व संस्कृतीने पर्यावरणाचा विकास करता येतो.
4. संस्कृती म्हणजे समाजाची एकूण जीवनपध्दती होय. त्यात भौतिक, बौध्दिक, नैतिक आणि अध्यात्मिक अशी जीवन पध्दती होय. या जीवनपध्दतीने पर्यावरण निकोप व विकसीत होऊ शकते.
5. समाजाच्या मानसिक, नैतिक, कलात्मक, बौध्दिक व जीवन व्यापी घटकांच्या द्वारे पर्यावरण वृध्दी, संवर्धन व रक्षण साधता येऊ शकते.

**संदर्भ सूची :-**


1. माधव मोरे व भिमराव मोरे, लेख-भारतीय समाज,धर्म, संस्कृती आणि पर्यावरण, रिसर्च प्रोसेस, व्हॉल्यूम-II, जानेवारी 2020, पृ.क्र. 84
2. तैत्रव, पृ.क्र. 85
3. तैत्रव, पृ.क्र. 85
4. दा.धो. काचोळे, लोकसंख्या आणि विकास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती 2014, पृ.क्र. 70
5. बी.पी. वांगीकर, पर्यावरणशास्त्र, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती 2007, पृ.क्र. 14
6. सुमन पाटे, समाजशास्त्र रूपरेषा, विद्या प्रकाशन, नागपुर, प्रथम आवृत्ती 1991, पृ.क्र. 81
7. अरूणा सावरगावकर, लोक संस्कृती व पर्यावरण यामधील सहसंबंध, रिसर्च प्रोसेस, व्हॉल्यूम-II, जानेवारी 2020, पृ.क्र. 10
8. तैत्रव, पृ.क्र. 11
9. डॉ.के.म. भांडारकर, पर्यावरण शिक्षण, नित्यनुतन प्रकाशन, पुणे, पृ.क्र. 27
10. डॉ. देवेंद्र जोशी, डॉ. उज्वला सदावर्ते, पर्यावरण शिक्षण, अदित्य पब्लिकेशन, नांदेड, पृ.क्र. 22
11. तैत्रव, पृ.क्र. 24
12. डॉ.के.म. भांडारकर, पर्यावरण शिक्षण, नित्यनुतन प्रकाशन, पुणे, पृ.क्र. 268



संशोधक

प्रा.बाळु आनंद भंडारे

ईमेल: bb4077778@gmail.com

मो.नं. 9370321681